नागपूर येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नवीन बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये फर्निचर पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआयएस-२०१८/प्र.क्र.१४/राऊशु-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १६ मार्च, २०१८.

वाचा:-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र.बीजीटी-१००८/प्र.क्र.५८/इएक्ससी-४, दि.०७.०१.२०११.
२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. बीएलडी-११२०१८/ १५२८२/ सहा, दि.१०.०१.२०१८.

शासन निर्णय:-

विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नगपूर या दोन्ही कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन दि.०७.०१.२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापि, सदर मान्यतेमध्ये कार्यालयाच्या फर्निचरचा समावेश नाही. आता, सदर कार्यालयासाठी फर्निचर पुरविण्यासाठीच्या रू.१,६३,९१,८५३ इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास (सेवा कराच्या तरतूदीसह), सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ नुसार, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या सहमतीस व खालील अटींच्या अधीन राहून, शासनाची प्रशासकीय मान्यता (वित्तीय मान्यता वगळून) देण्यात येत आहे.

i) अंदाजपत्रक गृह विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून साक्षांकित करण्यात यावे.
ii) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च गृह विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

हा आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/ प्र.क्र. ३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ नुसार, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उपविभाग-पाच मधील अ.क्र. १ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारान्वये व सार्वजनिक बांधकाम विभाग

अनौपचारिक संदर्भ क्र. ४०/ इमा-२, दि.०६.०३.२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३१६१२०२४००६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji Baburao Chavan

Digitally signed by Shivaji Baburao Chavan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9aa522e32450ec03b47343bc963097b0e134f043fb205f2e97595f145aaf4d73, serialNumber=b5ccfce8750c2a4b31ad76a42c0094dcbcc63834c3279619496c6858859c8594, cn=Shivaji Baburao Chavan
Date: 2018.03.16 12:04:04 +05'30'

(शिवाजी बा. चव्हाण)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-२, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
२. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारती-२/अर्थ-२, मंत्रालय, मुंबई.
४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर.
५. निवडनस्ती-राउशु १.

शासन निर्णय क्रमांक : एमआयएस-२०१८/प्र.क्र.१४/ राऊशु-१, दिनांक : १६ मार्च, २०१८ सोबतचे प्रपत्र-अ

Name of Wrok:- (A) Providing and fixing modular furniture for new State Excise Building at Nagpur.

Sr. No.	Particulars of Items	Amount (Rs.)
1	Cost of work	1,29,06,971
2	Contingencies 4%	5,16,278
3	G.S.T. 18%	23,23,255
4	Centage 5%	6,45,349
	Total	**1,63,91,853**

****